
निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २२९ वा.
बुधवार :२२ ऑक्टोबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247




## महाराष्ट्रातली दिवाळी पावसातच

मुंबई/प्रतिनिधी/ देशभर नैऋत्य मान्सूनने माघार घेतली असताना, बंगालच्या उपसागरात नवीन कमी दाबाचा क्षेत्र सक्रिय झालाय. हा पट्टा वातावरणात अस्वस्थता निर्माण करत असून, त्यामुळे महाराष्ट्राच्या विविध भागांत अवकाळी वर्षावाची शक्यता व्यक्त केली जातेय. त्यामुळे महाराष्ट्रातील दिवाळी यंदा पावसातच जाणार असल्याचं दिसतंय. हवामान विभाग म्हणजेच आयएमडीने २१ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या पावसाची माहिती दिलीय.हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात मुसळधार सरी कोसळण्याची शक्यता आहे. या बदलामुळे दिवाळीच्या आनंदात पावसाचा व्यंगचित्र बनण्याची भीती आहे. ज्यामुळे नागरिकांच्या अपेक्षांवर पाणी पडण्याची शक्यता आहे.

गेल्या दोन महिन्यांत मराठवाडा आणि इतर भागांत पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. यावेळी शेकडो घरे पाण्याखाली, आणि शेतीचे मोठे नुकसान झाले होते.





















## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविण्याची सुरुवात

**आत्ताच एक्सप्रेस/जालना (प्रतिनिधी)** आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा गट) जालना जिल्हा स्तरावर जोरदार तयारीला लागली आहे. जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये पक्ष कार्यकर्त्यांच्या बैठका आणि इच्छुक उमेदवारांशी सविस्तर चर्चा सुरू आहे.राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ते आगामी निवडणुकांमध्ये शिव, शाहू, फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची शिदोरी घेऊन मैदानात उतरण्यास सज्ज असल्याचे चित्र दिसत आहे.जालना जिल्ह्यातील सर्व आठ तालुक्यांत निवडणूक आढावा बैठकांना मोठा प्रतिसाद मिळत असून, पक्षाचे वरिष्ठ नेते आणि पदाधिकारी –माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया, शिवाजीराव चौथे, प्रदेश उपाध्यक्ष मधुकरराव आर्दड, रविंद्र तौर, चंद्रकांत कारके, शाह आलमखान, शेख महेमूद, अण्णासाहेब चित्तेकर, बळीराम कडपे, मिर्झा अन्वर बेग, जयमंगल जाधव, लक्ष्मण दळवी, मंगलताई पाटील, ज्ञानेश्वर सरकटे आदींचा जिल्हाभर दौरा सुरू आहे.या पार्श्वभूमीवर जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी जिल्ह्यातील जि.प., पं.स. आणि नगर परिषद निवडणुकांसाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया औपचारिकरीत्या सुरू केली आहे.यानंतर पक्षाची जिल्हा कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात येणार असून, त्यामध्ये प्राप्त झालेल्या अर्जांचा आढावा घेत इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम लवकरच जाहीर केला जाणार आहे.










## पाकिस्तान - तालिबान संघर्षबंदी म्हणजे मोठ्या संघर्षाची तयारी

भारताशी समोरासमोर युद्ध करणे शक्य नसल्याने पाकिस्तानने दहशतवादाला खतपाणी घालून भारतात अराजकता माजवण्याचा प्रयत्न केला. विशेषतः जम्मू काश्मीर मध्ये त्यांनी दहशतवाद्यांना हाताशी धरून जम्मू काश्मीर अस्थिर करण्याचा प्रयत्न केला. भारताशी लढण्यासाठी ज्या दहशतवादाचा पाकिस्तानने शस्त्र म्हणून वापर केला तेच दहशतवादाचे शस्त्र आता त्यांच्यावर बुमरँग होत आहे. तालिबान ही दहशतवादी संघटना आहे हे सर्व जगाने मान्य केले आहे. ज्या वेळी तालिबानने अफगाणिस्तानवर कब्जा मिळवला त्यावेळी जगातील बहुतेक देशांनी तालिबानच्या सरकारला मान्यता देण्यास नकार दिला मात्र पाकिस्तानने तालिबानला सुरवातीपासूनच समर्थन दिले. अफगाणिस्तानातील तालिबानी सरकारला मान्यता देणारा पाकिस्तान हा जगातील पहिला देश होता अर्थात त्यामागे त्यांचा वेगळा डाव होता. तालिबानला मान्यता दिल्यास तालिबानला सोबत घेऊन भारतात घुसखोरी करून भारतात अस्थिरता माजवता येईल तसेच जर भविष्यात भारताविरुद्ध युद्ध झाले तर त्यात तालिबानची मदत घेता येईल हा पाकिस्तानचा डाव होता. आज मात्र त्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला असून तालिबानने भारताशी पंगा न घेता पाकिस्तानशीच पंगा घेत पाकिस्तानातच घुसखोरी सुरू केली आहे. मागील वर्षी पाकिस्तान आणि अफगाणिस्तान सीमेवर प्रचंड तणाव निर्माण झाला होता. तालिबानने पाकिस्तानी हद्दीत प्रवेश करून पाकिस्तानच्या सीमावर्ती भागातील एका जिल्ह्यात सरकार स्थापन केले होते. याची कबुली खैबर पखतूनच्या राज्यपालांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली होती. पाकिस्तानच्या हातून हा भाग निघून गेल्याने पाकिस्तानमध्ये खळबळ माजली होती. हा होता या दोन्ही देशातील तणावाचा पहिला अंक. या दोन्ही देशातील तणावाचा दुसरा अंक यावर्षीच्या जानेवारी महिन्यात सुरू झाला. जानेवारी महिन्यात पाकिस्तानने अफगाणिस्तानच्या सीमावर्ती भागात हवाई हल्ले करून २ डझनाहून अधिक तालीबानिंना ठार केले. पाकिस्तानच्या या हवाई हल्ल्याला तालिबाननेही जशास तसे उत्तर दिले. अफगाणिस्तानने पाक अफगाण सीमेवर तैनात असलेल्या १९ पाकिस्तानी रेंजर्सला ठार केले इतकेच नाही तर अफगाणिस्तानने पाकिस्तानच्या २ चौक्यांवर देखील ताबा मिळवला. त्यानंतर काही काळ थांबलेला हा संघर्ष पुन्हा सुरू झाला. या दोन्ही देशातील तणावाचा तिसरा अंक सुरू झाला आहे. मागील आठवड्यात या दोन्ही देशात तब्बल सहा दिवस तुंबळ संघर्ष झाल्याचे पाहायला मिळाले. पाकिस्तानने अफगाणिस्तानवर हल्ले केल्यावर अफगाणिस्तानने ही पाकिस्तानला जशास तसे उत्तर दिले. हे उत्तर इतके जबरदस्त होते की पाकिस्तानला या संघर्षातून सपशेल माघार घ्यावी लागली. तालिबान्यांच्या हल्ल्यानंतर पाकिस्तानचे लष्कर आपल्या चौक्या सोडून पळून गेले. त्याचे व्हिडीओ देखील समाजमाध्यमांवर व्हायरल झाले अर्थात गिरे तो भी टांग ऊपर.... म्हणीप्रमाणे पाकिस्तानने या संघर्षात आपलाच विजय झाल्याचे सांगितले पण त्यांच्या या दाव्यावर जगानेच नाही तर पाकिस्तानच्या पत्रकारांनी आणि पाकिस्तानच्या जनतेनेही विश्वास ठेवला नाही. पाकिस्तान आणि तालिबान हा संघर्ष वाढू नये यासाठी कतार आणि सौदी अरेबिया यांनी मध्यस्ती केली आणि दोन्ही देशातील हा संघर्ष तात्पुरता थांबवला. आता जरी या संघर्षाला अल्पविराम मिळाला असला तरी या संघर्षाला पूर्ण मिळणार नाही हे नक्की म्हणजेच ही संघर्षबंदी फार काळ टिकेल असे वाटत नाही कारण पाकिस्तानच्या आपल्या विरोधातील आक्रमकतेमागे अमेरिकेचा हात आहे याची तालिबानी राजवटीला पूर्ण जाणीव झाली आहे त्यामुळे सध्याची संघर्षबंदी म्हणजे अधिक मोठ्या संघर्षाच्या तयारीचा भाग असू शकते. पाकिस्तानने अफगाणिस्तानला कमी लेखून मोठी चूक केली आहे. पाकिस्तानकडे अत्याधुनिक शस्त्रसाठा आणि अफगाणिस्तानपेक्षा कैक पट अधिक सैन्य आहे.









# दिवाळी की दिवाळा ?

ही दिवाळी की दिव-ाळा. प्रत्येक घटस्फोटीत मुलांमुलींच्या आयुष्याचा प्रश्न. कारण घटस्फोटानं प्रत्येकाच्या घरची दिवाळी साजरी होत नाही तर संसाराचा दिवाळाच निघत असतो. ज्या घटस्फोटात खुद्द आईवडील वा उमेदवाराचे नातेवाईक हस्तक्षेप करुन खतपाणी घालत असतात. अन् वकील तेल, तिखटमीठ लावत असतात.

पती हा आपल्या पत्नीवर निरतिशय प्रेम करीत असतो. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होत नाही. तो तिचंच ऐकतो आणि तिच्याच मनानं चालत असतो. त्याच प्रेमाचा फायदा घेवून प्रसंगी ती त्याच्या आईला वृद्धाश्रमात टाकत असते तर कधी त्याची भाऊ बहिण तोडत असते. नातेवाईकांचा प्रश्न तर वेगळाच राहिला.

वृद्धाश्रमात जो पती आपल्या आईवडीलांना टाकतो. तरीही तिला तो पती आवडत नाही. त्या पतीचं आईवडीलांना वृद्धाश्रमात टाकणं आवडतं. कारण तिला ती कोणतेही कृत्य करेना, तिला टोकणारा कुणी गृहस्थ घरेत असायला नको वा कोणाची कोणतीच वटवट घरात ऐकू यायला नको. दुसरा प्रश्न असतो. तो म्हणजे तिच्या आईवडील भावाचा हस्तक्षेप घरात होणं. जर तिच्या पतीचे आईवडील घरात असतील तर तिला आपले आईवडील घरात आणताच येत नाही वा भाऊबहिण आणि नातेवाईकांना घरात प्रवेश देताच येणार नाही. अशी तिची भावना असते.

पत्नी आणि पतीतील किरकोळ ही भांडणं. ज्यात पतीला पत्नी ही एक आपला गुलाम समजते. पतीनं थोडासा जरी आवाज चढवला की बस, सारंच त्याचं चुकलं असा कावा ती करते. ज्यातून पत्नीला बोलायची उजागीरीच नसते.

पती पत्नीच्या स्वभावाचं वर्णन केल्यास असं जाणवतं की एखादी गोष्ट करायची असल्यास पत्नी रोजच पतीमागं तकादा लावते. अर्थात ती मागणी पुर्ण होईपर्यंत लावून धरते. जर ती मागणी पुर्ण झाली की ती फारच आनंदीत होते. तशीच ती मागणी बरेचवेळेस तकादा लावूनही पुर्ण होत नसेल वा जर पुर्ण झाली नाही तर ती निराश होते. तिला पती हा कर्दनकाळच वाटतो. अशा-वेळेस तिच्या मनात संभ्रमच निर्माण होतो व त्याची परियंती तिची सोडून जाण्यात होते.

संसार टिकवणंही तारे-वरची कसरतच आहे. संसार त्याचाच टिकतो. ज्याची पत्नी संयमी व समजदार असते. ती आपला संयम सोडत नाही. वाट पा-हात असते क्षणाची. अगदी शेवटच्या श्वासापर्यंत. काही पत्नीवर्ग मात्र उतावीळ असतो. त्यांना पुरेशी वाट पाहण्याची उसंतच नसते. त्यांना वाटत असते की कोणतीही गोष्ट ही आताच व्हायला हवी. जर ती होत नसेल तर ती निराश होते.

## शुभ दीपावली निमित्त सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा

































दिपावलीच्या शुभेच्छा..
















## जालन्यात चार वर्षीय बालिकेचा भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्य

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/शहरात भटक्या कुत्र्यांची दहशत वाढली असून, नुकतेच एका चार वर्षीय चिमुकलीचा भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर, शहरातील वकील महेश सीताराम धनावत यांनी जालना महानगरपालिकेला कायदेशीर नोटीस बजावली आहे. या नोटीसद्वारे त्यांनी पीडित कुटुंबाला ५० लाख रुपयांची नुकसान भरपाई देण्याची आणि शहरातील भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

नोटीसमधील प्रमुख मुद्दे:ॲड. धनावत यांनी आपल्या नोटीसमध्ये जालना शहरातील गंभीर परिस्थितीवर बोट ठेवले आहे. त्यांनी म्हटले आहे की, शहरात भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांचे, विशेषतः लहान मुलांचे जीव धोक्यात आले आहेत. यापूर्वीही शहरात अशाच प्रकारची घटना घडली होती, ज्यात एका सहा वर्षीय बालिकेचा मृत्यू झाला होता. या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

महानगरपालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या श्वान नसबंदी कार्यक्रमाच्या परिणामकारकतेवर ॲड. धनावत यांनी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या कार्यक्रमावर मोठ्या प्रमाणात निधी खर्च होऊनही भटक्या कुत्र्यांची संख्या आणि त्यांची आक्रमकता वाढत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. त्यातच, महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना लाच स्वीकारताना अटक झाल्याने, या कार्यक्रमातही भ्रष्टाचार झाल्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे. त्यामुळे या कार्यक्रमाच्या खर्चाची आणि अंमलबजावणीची सखोल चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813